# प्रसिद्धीपत्रक

**विषय :-** अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स (AMR) आणि कालबाह्य औषधांच्या सुरक्षित विल्हेवाटीबाबत राज्यस्तरीय बैठक.

सार्वजनिक आरोग्य विभाग (महाराष्ट्र शासन) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच PATH, CHRI आणि GSK यांच्या संयुक्त विद्यमाने Antimicrobial Resistance (AMR) नियंत्रणासाठी 'वापरात नसलेल्या आणि कालबाह्य प्रतिजैविकांच्या (Unused/Expired Antibiotics) सुरक्षित विल्हेवाटीबाबत' एका महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय सल्लामसलत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा दिनांक ३० मार्च २०२६ रोजी मुंबई येथील हॉटेल प्रेसिडेंट येथे यशस्वीरीत्या पार पडली.

या प्रायोगिक प्रकल्पामध्ये देशातून महाराष्ट्र राज्याची निवड झाली असून त्यामध्ये पुणे महानगरपालिका व सातारा जिल्हा यांचे चयन करण्यात आले आहे.

या बैठकीत पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे प्रतिनिधी म्हणून MSU इनचार्ज आणि साथरोग नियंत्रण विभागाच्या सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांच्यासह परिमंडळ वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष मुळे, डॉ. दिपक पखाले, डॉ. रेखा गलांडे आणि डॉ. केतकी घाटगे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. पुणे मनपाच्या आरोग्य अधिकारी डॉ. निना बोराडे यांच्या सूचनेनुसार या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

सदर राज्यस्तरीय कार्यशाळेत प्रामुख्याने खालील महत्त्वपूर्ण सत्रे आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले:

- **KAP अभ्यासाचे निष्कर्ष:** AMR संदर्भातील Knowledge, Attitude and Practices (KAP) बेसलाईन असेसमेंट अभ्यासातील मुख्य निष्कर्ष PATH, CHRI आणि PCC टीमच्या वतीने (डॉ. शमयीता दास आणि डॉ. रिफत अंजुम) सादर करण्यात आले.
- **राष्ट्रीय सल्लामसलत बैठकीतील शिफारसी:** या विषयावर PATH चे वरिष्ठ सल्लागार डॉ. सचिन गुप्ते यांनी मार्गदर्शन केले.
- **नाविन्यपूर्ण मॉडेल्स (Current Practices):** औषधांच्या सुरक्षित विल्हेवाटीबाबत सध्याच्या पद्धती आणि 'nProud' सारख्या नाविन्यपूर्ण मॉडेल्सवर केरळचे निवृत्त सहाय्यक औषध नियंत्रक डॉ. शाजी वर्गीस यांनी सविस्तर माहिती दिली.
- **प्रणालीची तयारी व अंमलबजावणी (Panel Discussion):** वापरात नसलेल्या प्रतिजैविकांच्या सुरक्षित विल्हेवाट प्रणालीची तयारी (System Readiness) आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यावर एक विशेष पॅनेल चर्चा आयोजित करण्यात आली होती. CHRI चे हेल्थ सिक्युरिटी प्रमुख डॉ. निशांत शर्मा यांच्या संचलनाखाली झालेल्या या चर्चेत डॉ. विशाल कुलकर्णी, डॉ. शाजी वर्गीस, डॉ. के. के. लाल, डॉ. रुबी राफेल आणि इतर वैद्यकीय तज्ज्ञांनी सहभाग घेतला.
- **प्रशासकीय यंत्रणा (Group Activity):** AMR नियंत्रणासाठी आवश्यक असणारी प्रशासकीय यंत्रणा (Governance mechanism) विकसित करण्याबाबतचे सत्र डॉ. कांतीनाथ ऐनापुरे (वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी, CHRI) आणि नचिकेत गुडी (तांत्रिक अधिकारी, CHRI) यांनी घेतले.

आरोग्य क्षेत्रापुढील वाढते आव्हान असलेल्या 'अँटीमायक्रोबियल रेझिस्टन्स'चा प्रभावीपणे सामना करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली ही बैठक अत्यंत माहितीपूर्ण आणि उपस्थितांच्या ज्ञानात मोलाची भर घालणारी ठरली. यातून मिळालेल्या मार्गदर्शनाचा उपयोग पुणे शहरातील सार्वजनिक आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी निश्चितच होईल.

Vaishali (6/4/26)

(डॉ. वैशाली जाधव)
ऑफिस इनचार्ज MSU तथा
सहाय्यक आरोग्य अधिकारी,
साथरोग नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका.

(डॉ.निना बोराडे)
आरोग्य अधिकारी,
पुणे महानगरपालिका.